# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.01.2026** **वारःमंगळवार**

---

•७७वा प्रजासत्ताक दिन देशभरात उत्साहात साजरा

•नवी दिल्लीतल्या कर्तव्य पथावर दिमाखदार पथसंचलनातून देशाच्या सामर्थ्याचं आणि संस्कृतीचं दर्शन

•राज्यातही प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजन

•महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक वाढीचं शक्तिशाली केंद्र असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन

आणि

•संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज बोलावली सर्वपक्षीय बैठक

**<u>प्रजासत्ताकसोहळा</u>**

७७वा प्रजासत्ताक दिन सोहळा काल देशभरात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी दिल्लीतल्या कर्तव्य पथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत दिमाखदार पथसंचलन झालं. मुख्य सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अपर्ण करून शूरवीरांना आदरांजली वाहिली. मुख्य संचलनाला सुरुवात होण्यापूर्वी राष्ट्रपतींच्या हस्ते ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांना 'अशोक चक्र' प्रदान करून सन्मानित करण्यात आलं. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला, युरोपियन परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यंदाच्या पथसंचलनाची मध्यवर्ती संकल्पना स्वातंत्र्याचा मंत्र- वंदे मातरम् आणि समृद्धीचा मंत्र- आत्मनिर्भर भारत अशी होती. या दिमाखदार पथसंचलनात देशाच्या संरक्षण दलांचं सामर्थ्य आणि सांस्कृतिक विविधतेचं दर्शन झालं. विविध राज्य आणि केंद्र सरकाच्या मंत्रालयांचे ३० चित्ररथ या संचलनात सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूरचं प्रारूप दाखवणारा लष्कराचा चित्ररथ, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा ‘भारत गाथा - श्रुती, कृती, दृष्टी’ या संकल्पनेचा चित्ररथ, तसंच महाराष्ट्राच्या 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या विषयावरील चित्ररथानं उपस्थितांचं लक्ष वेधून घेतलं. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचं प्रभावी चित्रण महाराष्ट्राच्या चित्ररथात करण्यात आलं होतं. गणेशोत्सवाच्या

माध्यमातून मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा शाश्वत रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी हे या सादरीकरणाच्या केंद्रस्थानी होतं.

**<u>राज्य-प्रजासत्ताकदिन</u>**

**<u>इंट्रो</u>** :

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल राज्यातल्या नागरिकांना संबोधित केलं. लोकशाही प्रत्येक मताला महत्त्व आणि प्रत्येक नागरिकाला उत्तरदायित्व देते, असं प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केलं. महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक वाढीचं शक्तिशाली केंद्र असल्याचं सांगून ते म्हणाले......

*script- भारत के साथसाथ महाराष्ट्र भी विकास, सुशासन और आत्मनिर्भरता की दिशा में तेजी से आगे बढ़ रहा है। सरकार और समाज के संयुक्त प्रयासों से आत्मनिर्भर महाराष्ट्र का संकल्प साकार हो रहा है सुशासन का अर्थ है योजनाओं का पारदर्शी और समयबद्ध लाभ हर नागरिक तक पहुंचाना लोकतंत्र की सफलता का शासन और और जनता के मजबूत विश्वास पर निर्भर है महाराष्ट्र केवल भौगोलिक नहीं बल्कि भारत की आर्थिक प्रगति का सशक्त केंद्र है संत परंपरा सामाजिक चेतना और समृद्ध संस्कृति महाराष्ट्र की विशिष्ट पहचान है समुद्र तट सह्याद्री वन किले नदियाँ और पठार महाराष्ट्र को प्राकृतिक संपदा से समृद्ध बनाते हैं ।*

**<u>राज्य</u>**

राज्यातही सर्वत्र ७७वा प्रजासत्ताक दिन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. मुंबईत दादर इथल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. दावोस इथं नुकत्याच झालेल्या जागतिक आर्थिक मंच परिषदेत महाराष्ट्रानं 30 लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून येत्या काळात भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून महाराष्ट्र राज्य अधिक सक्षमपणे उभं राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या पोलीस क्रीडा संकुल इथं ध्वजवंदन केलं. संविधानानं दिलेल्या न्याय, अधिकार आणि स्वातंत्र्याची जाणीव ठेवून जनतेला केंद्रस्थानी ठेवणं हेच खरं प्रजासत्ताक आहे, असं शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री आणि पुणे  जिल्ह्याचे  पालकमंत्री अजित पवार यांनी पुण्यातल्या पोलीस संचलन मैदानावर आयोजित प्रजासत्ताकदिन सोहोळयात ध्वजवंदन केलं. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित  लोकशाही व्यवस्था टिकवणं ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे असं प्रतिपादन पवार यांनी केलं. पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छ पुणे संकल्प या उपक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धी रथालाही उपमुख्यमंत्री पवार यांनी  हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.

राज्याच्या  सर्वच जिल्हा मुख्यालयांच्या  ठिकाणी संबंधित पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात  आलं.

**<u>इंट्रो</u>**

**<u>प्रजासत्ताकदिन</u>**

७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्र प्रथम या उपक्रमांतर्गत प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यभरात शालेय विद्यार्थ्यांनी एकाच वेळी देशभक्तिपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन केलं. या उपक्रमाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्ये नोंद झाल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिली आहे. राज्याच्या सर्व विभागांमधल्या १ लाख शाळांमधल्या २ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी आणि ७ लाख शिक्षकांनी या उपक्रमात भाग घेतला. अनेक सामाजिक उपक्रमही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राज्यात घेण्यात आले. त्याबाबतचा हा वृत्तांत

**<u>व्हीसीस्क्रिप्ट</u>**

*नवी मुंबई महानगरपालिका आणि प्रोजेक्ट मुंबई यांच्या संयुक्त सहभागातून सिंगल यूज प्लास्टिकवर पुनर्प्रक्रिया करून बाकं तयार करण्यात आली आहेत. प्रजासत्ताक दिनाचं  औचित्य साधून या बाकांचं वितरण पालिका आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांच्या हस्ते महानगरपालिका क्षेत्रातल्या  शाळांना करण्यात आलं.*

*नवी मुंबईतील सहा महाविद्यालयांच्या राष्ट्रीय  सेवा  योजनेतल्या  विद्यार्थ्यांनी टेकडी परिसर स्वच्छ करून 900 किलो हून अधिक कचरा संकलित केला.*

*रत्नागिरीतही काल ई-यंत्रण हा ई-कचरा संकलनाचा उपक्रम राबवण्यात आला. त्यातून १४ केंद्रांवर मिळून सुमारे ५०० किलो ई-कचरा संकलित करण्यात  आला.*

*सिंधुदुर्ग जिल्हयातल्या समुद्रात असलेल्या निवती रॉक बेटावर अनोख्या आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात ध्वजवंदन सोहळा साजरा झाला. ६० ते ६५ मच्छिमार नौकांनी एकत्र येत समुद्रातून ध्वजाला वंदन केलं. समुद्र, मच्छिमार आणि सुरक्षा यंत्रणा यांचा संगम असलेला हा सोहळा देशभक्तीची भावना अधिक दृढ करणारा ठरला.*

*नाशिक इथल्या स्कूल ऑफ आर्टिलरीच्यावतीनं प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानं  काल पोलीस कवायत मैदानावर ड्रोनची प्रात्यक्षिके सादर करण्यात  आली. तसंच तोफांचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. यामध्ये बोफोर्स, होविट्झर आणि अन्य उखळी तोफांचा समावेश होता.*

*गडचिरोलीमध्ये सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते एशियन युथ पॅरा गेम्समध्ये धनुर्विद्या प्रकारात सुवर्णपदक मिळविणाऱ्या श्वेता कोवे या विद्यार्थिनीला ५ लाख २० हजार रुपयांचे क्रीडा साहित्य प्रदान  करण्यात आलं.*

*हिंगोलीमध्ये पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या  उपस्थितीत बालविवाह प्रतिबंधक शपथ आणि संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आलं.*

*प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला अहिल्यानगरच्या ऐतिहासिक भूईकोट  किल्ल्यावर भारतीय सैन्याच्या मेकॅनाइज्ड इन्फंट्रीच्या जवानांनी त्यांच्या वाद्यांवर देशभक्तीपर धून  वाजवली. यावेळी जमलेले शेकडो नागरिक भारावून गेले.*

*प्रजासत्ताक दिनी राज्यभरातील 1 लाख शाळांमधील 2 कोटी विद्यार्थ्यांनी 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेवर आधारित देशभक्तीपर गीतांवर सामूहिक सादरीकरण केलं.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठीकठिकाणच्या बातमीदारांसह योगेश रांगणेकर पुणे*

**<u>सर्वपक्षीयबैठक</u>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर आणि कामकाजावर चर्चा करण्यासाठी, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सकाळी 11 वाजता सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. प्रारंभी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना संबोधित करतील.

१ फेब्रुवारीला 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जाईल. या अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. तर दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्च ते २ एप्रिल या कलावधीत निश्चित करण्यात आलं आहे.

**राज्यसरकारई-गव्हर्नन्स**

राज्य सरकारच्या दीडशे दिवसांच्या ई गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमा अंतर्गत नऊ सरकारी कार्यालयांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेच्या मूल्यांकानुसार या कार्यालयांची निवड झाल्याचं मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय, पनवेल महानगरपालिका, नाशिक पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय, आणि नांदेड पोलीस महानिरीक्षक कार्यालयांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र सागरी मंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यालयांचाही यात समावेश आहे.

**आरोग्यसुविधाधोरण**

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागानं आरोग्यसुविधा बळकट करण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधी वापरण्याचं नवं धोरण जाहीर केलं आहे. या धोरणानुसार कंपन्यांनी सीएसआर निधी प्रामुख्याने वस्तुरूपात देणं अपेक्षित आहे. शासन आणि उद्योग क्षेत्र यांच्यात समन्वय वाढवून सार्वजनिक आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे, हा या धोरणाचा उद्देश असल्याचं आरोग्य विभागानं सांगितलं आहे.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी वाढ झाली आहे, येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.